# N.S.S Special Winter Camp Report




**Camp Date :** 27 Jan. 2023 to 02 Feb 2023
**Camp Venue :** Shri Viththal Temple,Balade Tal Shirpur Dist Dhule

Programme officer
National Service Scheme
R.C.Patel Arts,Com.&Sci.College
Shirpur, Dist.Dhule

| | |
|---|---|
| **Prof. R..M.Suryawanshi** | **Dr.D.R.Patil** |
| N.S.S.P.O. | Principal |

**R.C.Patel Educational Trust's**

**R. C. Patel Arts Commerce and Science College, Shirpur**

N.S.S.

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर अहवाल

या वर्षी आर.सी.पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो एकाकास २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षास २५० नियमित विद्यार्थी व १२५ विशेष हिवाळी शिबिरार्थी विद्यार्थी अशी परवानगी विद्यापीठाकडून मिळाली.या वर्षी विशेष हिवाळी शिबीर घेणेसाठी मौजे. बाळदे ता. शिरपूर येथे शिबीर घेण्यासाठी विद्यापीठाने परवानगी दिली.माननीय प्राचार्यांच्या सहमतीने शिबिराचा कालवधी दि.२७/०१/२०२३ ते ०२/०२/२०२३ असा ठरविण्यात आला.

या वर्षी विद्यापीठाने ठरविल्या प्रमाणे *"युवकांचा ध्यास ग्राम-शहरी विकास"* हि थीम घेऊन विद्यापीठ व महविद्यालयाच्या पूर्व परवानगीने मौजे:बाळदे येथे सात दिवसाचे निवासी शिबीर घेण्याचे ठरले. शिबिरासाठी आवश्यक ती पूर्वतयारी, विद्यापीठाने ठरविलेल्या विषयानुसार वक्त्यांचे विषय व वक्ते यांचे नियोजन, कार्यक्रम पत्रिका छपाई, मंडप, ध्वनी प्रक्षेपक, स्वयंपाकी, किराणा, भाजीपाला यांचे नियोजन करण्यात आले.

निवडक स्वयंसेवकांना घेऊन दि.२७/०१/२०२३ शुक्रवार रोजी सर्व साहित्य खाजगी वाहनाने बाळदे येथे नेण्यात आले. विठ्ठल रुख्मिणी मंदिराच्या परिसरात निवासी शिबीर आयोजित केले होते. मंदिराचा परिसर स्वच्छ करून साफसफाई करण्यात आली. पाण्याची सोय करण्यात आली. दि. दि.२७/०१/२०२३ रोजी उदघाटनाची तयारी प्रा.रामकुमार सुर्यवंशी कार्यक्रम अधिकारी,प्रा. गोपाल बिडे,आणि संघ व्यवस्थापक यांनी केली.

दि दि.२७/०१/२०२३ शुक्रवार रोजी ठिक ८ वाजता शिबिरार्थी विद्यार्थांचे बाळदे येथे आगमन झाले.विद्यार्थांना आवश्यक त्या सूचना देउन गट पाडून संपूर्ण तयारी करण्यात आली. उद्घाटनाचा कार्यक्रम ठिक १० वाजता नियोजित वेळेवर सुरु करण्यात् आला. महिला दिनानिमित्तचे औचित्य साधून कार्याक्रमाचे उद्घाटक श्री मनोहर प्रकाश पाटील(जनरल मनेजर,गुजरात समाचार) हे होते. कार्यक्रमास विशेष अतिथी श्री.संभाजी पाटील (मा.आमदार,शिरपूर),श्री.शांतीलालपाटील(मा.संचालक,कृ.उ.बा.स.,शिरपूर),श्रीनिम्बाजी पाटील(मा.मुख्याध्यापक,पळासनेर), श्री.संजय पाटील(चेअरमन,वी,का,सोसायटी,शिरपूर) ,गुलाब पाटील(उपसरपंच,बाळदे),रामचंद्र पाटील(मा.मुख्याध्यापक,शिरपूर)व अन्य सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्याक्रमचे अध्यक्ष मा. उपप्राचार्य डॉ. आर.डी.जाधव होते. दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन करून कार्याक्रमचे उदघाटन झाले. सर्व अतिथींचे स्वागत न्यापकीन , गुलाब पुष्प देवून करण्यात आले.श्री.संभाजी पाटील यांनी विद्यार्थांच्या विकासात रा. से यो. चे महत्व विषद केले. म. प्राचार्यांनी रासेयो मुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता व मानसिकता कशी बदलते या वर भर दिला.उद्घाटन सोहळा उत्कृष्टरित्या पार पडला. कार्यक्रमानंतर सर्व अतिथी व शिबिरार्थी यांनी स्वादिष्ठ वरण भात पुरी जेलेबी व वांग्याची भाजी चा आस्वाद घेतला.

N.S.S.

दुपारच्या सत्रात श्री मनोहर प्रकाश पाटील (जनरल मनेजर,गुजरात समाचार)यांचे वृतपत्र एक सामाजिक माध्यम या विषयावर व्याख्यान होते. सरांनी आपला विषय मांडून विद्यार्थांशी हितगुज केली. सरांनी या संबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन शिबिरार्थींना दिले. संद्याकाळी विविध खेळ व गटचर्चा झाली. रात्री ८ वाजेला जेवण आटोपून सांकृतिक कार्यक्रम घेतले.रात्री च्या जेवणासाठी बी.पी.एल. कुटुंब श्री रामदास भिल व परिवार यांस आमंत्रित केले होते. रात्री १० ला दिप् मालवण करून सर्व शिबिरार्थी निद्राधीन झाले.

दि २८/०१/२०२३ रोजी नित्य कार्यक्रम आटोपून  विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले.टाळ मृदंग यांच्या संगतीने " जय जय राम कृष्ण हरी"  चाल धरत संपूर्ण गावात प्रभात फेरी काढली. यात गावकरी देखील सहभागी झाले. हा सकाळचा दैनंदिन कार्यक्रम सात दिवस चालला. सकाळी योगासने झाली, सकाळचा नाश्ता व चहा आटोपून शिबिरार्थी श्रमदानासाठी सज्ज झाले. गट नुसार साहित्य वाटप करण्यात आले. व  गट गटाने मंदिराची साफसफाई करण्यात आली. सदर श्रमदान १२.३० पर्यंत चालले. दुपारी १२.३० ला स्नानादी आटोपून विद्यार्थांनी रूचकर भोजनाचा आस्वाद घेतला.दुपारच्या सत्रात प्रा. संदीप पाटील यांचे सूक्ष्मजीवांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर व्याख्यान होते. सदर व्याख्यान दोन तास चालले. विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची छान उत्तरे दिली. आजच्या दुसऱ्या सत्रात सौ अमृता जोशी यांचे आहार विहार व मानसिक स्वास्थे या विषयावर व्याख्यान होते.सायंकाळी गट चर्चा झाली विविध खेळ व संगीत संध्या झाली. रात्री जेवणांत कडी-खिचडी व जिलेबी चा बेत होता. विद्यार्थांनी आस्वाद घेतला. अहवाल लेखनानंतरदिप् मालवण केले.

दि. २९/०१/२०२३ रोजी सकाळचा नित्य कार्यक्रम आटोपून विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले. प्रभातफेरी नंतर योगासने झाली. आज नसत्या साठी उपमा बनवलेला होता. सकाळी ८.०० वाजता  चहा नाश्ता आटोपून विद्यार्थी श्रमदानासाठी तयार झाले. आज सर्व गट बाळदे गावातील रस्ते,गल्ली, सरकारी दवाखाना परिसर इत्यादी परिसराची साफसफाई करण्यास तयार झाले. तेथील विटा, उचलून रचणे, गवत साफ करणे, जामिन सपाट करणे,रेतु उचलून ट्रक्टर मध्ये भरून देणे, संपूर्ण परिसर स्वच्छ करणे इ. कामे सर्व विद्यार्थांनी केली दु. १.०० वाजेपर्यंत श्रमदान चालले. दुपारी भोजनानंतर विद्यार्थांनी थोडी विश्रांती घेऊन व्याख्यान सत्रासाठी सज्ज झाले. प्रा. कल्याणी महाजन यांनी शिका कसे शिकावे या विषयी मार्गदर्शन केले.दुपारच्या बौद्धिक सत्रात आज आजच्या दुसऱ्या सत्रात श्री अल्केश भावसार यांनी "रा.से यो.तून नेतृत्त विकास" या विषयावरक मार्गदर्शन केले.त्यानंतर विद्यार्थांनी गट चर्चा केली.सायंकाळी विद्यार्थ्यानी सांगिक खेळ केले. रात्रीच्या रुचकर भोजना नंतर  अहवाल लेखन करून दिवसाची सांगता दीप मालवण करून केली.

दि. ३०/०१/२०२३ ची सुरुवात नित्यकाम आटोपून प्रभात फेरीने झाली. सकाळी योगासने आटोपून सकाळी ८.०० ला शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार होते . आज मठाची उसळ होती सर्वांनी त्याचा आस्वाद घेत श्रमदानाची तयारी केली. आजचे श्रमदान टप्प्या-टप्प्यात होते. शिबिरार्थींचे गटात विभागून श्रमदानास सुरुवात केली पहिल्या गटाने ग्राम स्वच्छता करून गटारी स्वच्छ केल्या. दुसऱ्या गटाने जि.प.शाळेचा मागील परिसर जो खूपच खराब झालेला होता त्याची स्वच्छता करण्यासाठी झाडे कापली, गवत उपटले, संपूर्ण परिसर पिंजून काढत स्वच्छ केला. संपूर्ण कचरा बाहेर फेकला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या रुचकर भोजना नंतर शिबिरार्थींनी थोडा विश्राम करून दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली. श्री उमेश पाटील यांना स्त्री पुरूष समानता या विषयावर व्याख्यानास बोलविले होते. श्री उमेश पाटील यांनी स्त्री पुरूष लिंग गुणोत्तर, बालविवाह,अगर्भाक हत्त्या,हुंडाबळी इ संबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन शिबिरार्थींना दिले. व याविषयांवर यासाठी पुढे सरसावलेल्या संस्था या वर सखोल मार्गदर्शन केले. यासाठी कायद्यात काय-काय तरतुदी आहेत या विषयाच्या विविध पैलूंवर सखोल माहिती शिबिरार्थींना दिली. श्री उमेश पाटील यांनी अतिशय सोप्या भाषेत आपला विषय मांडला. विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.डॉ. विजय गर्गे यांचे संभाषण कौशल्य व मुलाखत तंत्र या वर सखोल मार्गदर्शन केले.स्वयंसेवकांनी चहापानानंतर गटचर्चा करून गाणी म्हटली. रात्रीचा जेवणात पातोद्यांची मसालीभाजी व भाकरी चा रुचकर भोजना नंतर अहवाल लेखन करून दिवसाची सांगता दीप मालवण करून केली.

दि. ३१/०१/२०२३ ची सुरुवात " जय जय राम कृष्ण हरी" हया गजराने प्रभात फेरी झाली. प्रभात फेरीने झाली. त्या नंतर योगासने आटोपून शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार झाले. आज स्वयंपाकी बाबांनी पोहे तयार केले होते सर्व शिबिरार्थीनी चहा नाश्ता घेऊन श्रमदानासाठी तयार झाले. आजचे श्रमदान हे दोन टप्प्यात होते. काही गटांनी बी. पी एल वस्ती साफ सफाई तर काही गटांनी ग्राम सफाई,शाळेचा, गटारी स्वच्छ करणे असा होता, सर्व साहित्य घेऊन शिबिरार्थी श्रमदानास निघाले. सर्वी कामे विभागली गेली असल्यामुळे अतिशय शिस्तीत संपूर्ण श्रमदान करून, सर्व परिसर स्वच्छ केला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या भोजनात वांगी-बटाटे-मटार-गोबी मिक्सभाजी व चपाती चा रुचकर भोज नंतर शिबिरार्थींनी थोडी विश्रांती घेऊन दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली.

आजच्या पहिल्या व दुसऱ्या बौद्धिक सत्रात डॉ. विलास वरुडे आणि श्री दौलत मोरे(धुळे जिल्हा सिकलसेल समन्वयक) यांना निमंत्रित केले होते. दोघांनीही "सिकलसेल आजारांवर स्वयंसेवकांना व गावकर्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी या विषयाची मांडणी व विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांनी सिकलसेल ची संकल्पना सांगून सिकलसेल होऊ नये याकरिता मार्गदर्शन केले.सरांनी आपला विषय अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगितला व शिबिरार्थी विद्यार्थांना असलेल्या शंकांचे निरासन केले. शिबिरार्थींच्या विचारलेल्या प्रश्नांचे

N.S.S.

निरसन केले. स्वयंसेवकांनी चहापानानंतर गटचर्चा करून शिबिराचा शेवटचा दिवशी सादर करावयाचा सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली. रात्रीचा जेवणात शेव भाजी मसाली भात व पोळी होती. अहवाल लेखन करून दिवसाची सांगता दीप मालवण करून केली.

दि १/०२/२०२३ ची सुरुवात सकाळी ५.३० ला प्रभात फेरीने झाली. योगासने व व्यायाम आटोपून स्नानादी करून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. चहा नाश्ता आटोपून विद्यार्थी  श्रमदानास तयार झाले. श्रमदान हे दोन टप्प्यात होते. काही गटांनी श्रमदान हे गावातील अमरधाम परिसरात साफ सफाई केली. नंतर संपूर्ण परिसर स्वच्छ केला. या श्रमदानास तीन तास लागले.दुपारी सर्वांसाठी चवळी भाजी व पोळी चा बेत होता शिबिरार्थींनी स्वादिष्ट भोजनावर ताव मारला. थोड्या विश्रांतीनंतर शिबिरार्थी दुपारच्या बौद्धिक सत्रासाठी तयार झाले. आजच्या बौद्धिक सत्रात श्री.डॉ दिपक बाविस्कर यांचे "स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी" या विषयावर व्याख्यान होते. सरांनी अतिशय सुंदर शब्दात आपला विषय मांडला व शिबिरार्थींच्या सर्व शंका व प्रश्नांचे उत्तरे दिली.दुसऱ्या सत्रात डॉ.नागोराव डोंगरे शिरपूर रासेयो विभागीय अधिकारी यांचे राष्ट्र निर्माणासाठी युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यान आयोजित होते. सर्व शिबिरार्थी व्याख्यानासाठी तयार झाले सरांनी विविध पैलूवर छान प्रकाश टाकला विद्यार्थी ही समरस झाले. सर्वांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. सरांनी सर्व शंकांचे निरसन केले. सायंकाळी चहापानानंतर शिबिरार्थींनी विविध खेळ केले. गटचर्चा रंगली. रात्रीच्या भोजनात वांग्याचे भरीत व कळण्याची भाकरी पुरी मोतीचूर लाडू असा बेत होता शिबिरार्थींनी त्याचा आस्वाद घेतला.रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी जि.प शाळा बलदे येथे विविध असे १६ सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. जसे नाटक गाणी नृत्य इत्यादी सदर कार्यक्रमासाठी गावकरी सुध्दा उपस्थित होते.नंतर रात्री ११.०० वाजता दीप मालवण केले.

दि. ०२/०२/२०२३ ची सुरुवात प्रभातफेरी ने झाली. आज समारोपाचा दिवस होता.  योगासने आटोपून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. ते आटोपून  समारोपाच्या कार्याक्रमाची तयारी केली.  सकाळी १०.०० वाजेच्या बौध्दिक सत्रात प्रा.सौ.मानसी वैद्य यांचे "खेळ विचारांचा" या विषयावर व्याख्यान होते. त्यांनी स्वयंसेवकांना विविध मैदानी व बौद्धिक खेळांचा माध्यमातून बौद्धिक व शारीरिक विकास कसा साधता येईल या विषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या भोजनात वरण बट्टी ,मठाची भाजी व मोहनथाल असा बेत होता. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, रासेयो जिल्हा विभागीय समन्वयक डॉ दत्ता दले सर, गावातील सर्व मान्यवर व्यक्ती समारोपासाठी हजर होते. दुपारच्या भोजनाचा आस्वाद घेतल्या नंतर  समारोपाचा कार्यक्रम ठीक २.०० वाजता सुरु झाला. समारोपाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.डी जाधव होते. कार्यक्रमासाठी गावाचे सरपंच, ग्रामसेवक,पोलीस पाटील, उप सरपंच ,डॉ.बाविस्कर,श्री.जितेंद्र पाटील,श्री.निम्बाजी पाटील,श्री लक्ष्मण पाटील व सर्व सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती

N.S.S.

पूजनाने झाली. उपप्राचार्यांचा, व सर्व आमंत्रित मान्यवरांचा सत्कार कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रा.आर.एम.सुर्यवंशी यांनी केला. त्यानंतर कार्यक्रमाचे अहवाल वाचन प्रा. प्रा.आर.एम.सुर्यवंशी यांनी केले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांपैकी वासुदेव पाटील,सचिन राजपूत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावाचे प्रतिनिधी म्हणून उप सरपंच सो यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थींची शिस्त व आचरण गावकरींना भावले.तद्नंतर रासेयो जिल्हा विभागीय समन्वयक डॉ दत्ता दले सरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मा. उपप्राचार्यांनी गावकरींना धन्यवाद केले. व शिबिरार्थींनी आपल्या भावी आयुष्यात रा. से. यो. ची शिस्त अंगीकारावी असे सांगितले.मा. प्राचार्यांनी रा से यो मुळे सामाजिक बांधिलकी कशी जोपासावी हे सांगून आम्हाला संबोधिले.कार्यक्रमचे सूत्रसंचालन डॉ.अनिता जाधव यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल बिडे यांनी केले. तसेच शिबिराच्या यशस्वीतेसाठी ज्या गावकरींनी अनमोल सहकार्य केले त्यांचा सत्कार करून आभार मानले. कार्यक्रम संपल्यावर सर्व साहित्यांची जुळवाजुळव करून सर्व सामान खाजगी वाहनात ठेवले. नंतर सर्व शिबिरार्थी यांनी महाविद्यालयाकडे प्रस्थान केले. सर्वांसाठी हा एक चांगला व नवा अनुभव होता. संपूर्ण शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.


**Inauguration  Program of NSS Winter Camp at Balade 2023**




Swacchta Abhiyan in NSS Winter Camp at Balade 1




**Swacchta Abhiyan in NSS Winter Camp at Balade 2**



**Swacchta Abhiyan in NSS Winter Camp at Balade 3**



**Tree Plantation by Dr.Datta Dhale (Dhule Dist.NSS Coordinator) in NSS Winter Camp at Balade**



**Swami Vivekanand Group Volunteer in NSS Winter Camp at Balade**



N.S.S.

**News Published in Dainik Punya Nagari & Deshonnati**

# पुण्य नगरी

## बाळदे येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन



**धुळे** : बाळदे ता.शिरपूर येथे आर. सी. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन मनोहर प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील, उपप्राचार्य डॉ. ए.एम. पाटील, डॉ. आर.डी. जाधव, साहेबराव पाटील, निंबाजी पाटील, सरपंच मंदाबाई बिल, उपसरपंच निंबाजी पाटील यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी मनोहर पाटील, प्राचार्य डॉ.डी.आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.रामकुमार सूर्यवंशी यांनी केले.सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अनिता जाधव यांनी तर आभार सहकार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल बिडे यांनी मानले.

Smart Dhule Edition
Jan 31, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com

# देशोन्नती

## आर. सी. पटेल महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...



**शिरपूर** ▫ येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर बाळदे येथे संपन्न झाले.

शिबिराचा समारोप राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. प्रा. दत्ता ढाले यांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमाला बाळदे गावातील निंबाजी तोताराम पाटील (माजी उपसरपंच), हिरामण नथ्थू पाटील (चेअरमन विकास सोसायटी, बाळदे) हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. प्रा. दत्ता ढाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे मूल्य स्वतःच्या अंगी रुजवून राष्ट्राच्या, समाजाच्या हितासाठी कार्य करत राहण्याचा संदेश या प्रसंगी दिला. बाळदे गावाचे उपसरपंच यांनी स्वयंसेवकांनी केलेल्या विविध कामांचा गावकऱ्यांना कसा उपयोग झाला या विषयी गौरोद्गार काढले.

स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, मतदान जागृती, बेटी बचाव, बेटी पढाव, बालविवाह अशा विविध विषयांवर जनजागृती करण्यासाठी केलेल्या उपक्रमांचीही प्रशंसा केली.

स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्रीय सेवा योजना व जीवनात झालेला बदल याविषयी आपले अनुभव उपस्थितां समोर मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आर. डी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना व आजचा विद्यार्थी यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सहाय्यक महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिता बी. जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रामकुमार सूर्यवंशी यांनी केले. आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल कैलास भिडे यांनी मानले.

कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील उपस्थित होते. प्रा. शुभांगी पिंगळे, प्रा. मोहिनी पाटील, प्रा. विजयालक्ष्मी शेळके, प्रा. राजश्री चौधरी, प्रा. राजश्री जाधव, प्रा. अंजुम काजी, प्रा. निशा बोरगावकर उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी गणेश सोनार, बन्सीलाल चौधरी, मेहुल गुजराथी, डी. यू. पटेल, संदेशसिंग राजपूत तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

Deshonnati Edition
Feb 12, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

Programme officer
National Service Scheme
R.C.Patel Arts, Com. & Sci. College
Shirpur, Dist. Dhule

N.S.S.

**डॉ.डी.आर पाटील**
प्राचार्य

**प्रा.आर.एम.सुर्यवंशी**
रासेयो कार्यक्रम अधिकारी